# ऋणनिर्देश

डॉ. स. ग. मालशे यांनी 'शोधनिबंधाची लेखनपद्धती' या छोट्याशा मार्गदर्शनपर पुस्तिकेत सांगितल्याप्रमाणे 'वाटोळी भाकरी प्रथम कुठे मोडावी हे नवीन संशोधन कार्य करणाऱ्या संशोधक छात्राला कळत नाही.' हे स्वानुभवाने मला पटले आहे. तथापि शोधनिबंध लिहितांना सुहृदय व सहानुभूतिशील मार्गदर्शक वरिष्ठांचे सहकार्य, आवश्यक लेखनसामुग्री (पुस्तके, पैसा, स्टेशनरी इ.) या गोष्टी एकत्रित जमून आल्या आणि चिकाटी सोडली नाही तर शोधनिबंधाचे काम सुखकर व त्वरीत होऊ शकते हे मी स्वानुभवावरून खात्रीने सांगू शकतो. त्यामुळे या शोधनिबंधाच्या कार्यात ज्यांनी मला बहुमोल मदत केली, त्यांचा नामनिर्देश करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

वर सांगितल्याप्रमाणे या शोधनिबंधाचे कार्याच्या सुरवातीपासून ते शेवटपर्यंत अतिशय उत्साहाने, सतत मार्गदर्शन व सूचना करून त्यास आवश्यक तसा आकार देण्याचे काम करणाऱ्या व सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या माझ्या मार्गदर्शिका डॉ. सुमन पाटील, एम्. फील. पदवी परीक्षेसाठी प्रोत्साहन देणारे, पुरोगामी व ज्येष्ठ विचारवंत मा. प्रा. एन्. डी. पाटीलसाहेब, प्राचार्य व्ही. बी. सायनाकर सर यांचे ऋण अपार आहेत. सुविद्य आणि विवेकी, थोर संशोधक मा. डॉ. य. दि. फडके, शिवाजी विद्यापीठातील प्रेमळमुर्ति डॉ. ल. रा. नसिराबादकर, व डॉ. गो. मा. पवार, माझे गुरु डॉ. वि. रा. तोडकर, प्रा. व्ही. डी. कदम, प्रा. मा. के. यादव, प्रा. सौ. सुर्यमाला जाधव, प्रा. बोकाज यांचे मार्गदर्शन व चर्चा, तसेच माझे सहकारी मित्र प्रा. अनिल पाटील, प्रा. एन्. एम्. पाटील व प्रा. मुळीक सर यांनी केलेली मदत व चर्चा उपयुक्त व मोलाच्या ठरल्या; किंबहुना त्यांच्या हार्दिक सहकार्यामुळेच मी हे कार्य पार पाडू शकलो याची मला जाणीव आहे. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर मधील सर्व प्रशासकीय सेवक सहकाऱ्यांनी मित्रकर्तव्य समजून अनेकदा अभिमानास्पद अशी मदत केली आहे.

या शोधनिबंधाच्या दृष्टीने महत्वाचे काम म्हणजे ग्रंथांची उपलब्धी हे होय. आगरकरांच्या आत्मचरित्राची, आगरकरांचे समकालीन असलेल्या मंडळिकांची सही शिक्का असलेल्या अस्सल पहिल्या आवृत्तीची झेरॉक्स प्रत, माझे पूर्वीचे सहकारी व स्नेही डॉ. हरिश्चंद्र निर्मळे (फर्ग्युसन कॉलेज, पुणे) यांनी पाठवून दिल्यामुळेच हे संशोधन कार्य निःशंकमनाने करणे शक्य झाले. यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन मधील, कराड नगरपालिका वाचनालयाचे सुविद्य, सूज्ञ ग्रंथपाल श्री विठ्ठलराव पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूरच्या ग्रंथालयातील आपुलकीच्या व मित्रत्वाच्या नात्याने वागणारे व संशोधन कार्याविषयी आस्था बाळगणारे श्री विजयकुमार तिबिले - सहायक ग्रंथपाल, श्री. एस्. एस्. पाटील - ग्रंथपाल व ग्रंथालयीन कर्मचारी वर्ग, सतत प्रेरणा देणारे, साहित्यप्रेमी माझे जिवलग मित्र अविनाश मोहिते, नेहमी कामाचा ताण असूनही मित्रत्वाच्या भावनेने टंकलेखन करून देणारे माझे मित्र व एकेकाळचे सहकारी - श्री विनायकराव फार्णे व श्री. डी. के. पाटील, सुबक झेरॉक्स काढणारे माझे मित्र श्री सुधीर चरापले (अक्षर झेरॉक्स, इस्लामपूर), ग्रंथाची सुबक बांधणी करणारे रचना मुद्रणालयाचे श्री चरापले या सर्वांचे तसेच ज्ञात-अज्ञात पणे सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मी ऋण मानतो, आणि त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद देतो.

— प्रा. बा. कृ. भिलारे.